मा सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्रमांक 8928/2015
व इतर याचिकांमध्ये दिनांक 6 जूलै, 2017 रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अनुसूचित जमातीचे जातप्रमाणपत्र अवैध ठरलेल्या आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, अहिल्यानगर अंतर्गत आरोग्य सेवक (महिला) या संवर्गातील अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या नियुक्त्यांना मुदतवाढ देणेबाबत.

जिल्हा परिषद,अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जा क्र आरोग्य/आस्था-4/656/2025.
अहिल्यानगर दिनांक09/10/2025.

वाचा:- 1. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र बीसीसी-2018/प्र क्र 308/16-ब दिनांक 21/12/2019.
2. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र बीसीसी-2018/प्र क्र 581ए/16-ब दिनांक 14/12/2022
3. या कार्यालयाकडील आदेश क्र आवि/कार्या-2/आस्था-4/891/2022 दि. 09/12/2022.
4. या कार्यालयाकडील आदेश क्र आवि/कार्या-2/आस्था-4/851/2023 दि. 12/12/2023.
5. या कार्यालयाकडील आदेश क्र आवि/कार्या-2/आस्था-4/845,847,849/2023 दि. 12/12/2023.
6. या कार्यालयाकडील आदेश क्र आवि/कार्या-2/आस्था-4/179,180,181,182/2025 दि. 24/02/2025.
7. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र बीसीसी-1123/प्र क्र 29/आरक्षण-2 दिनांक 04/10/2024.

मा सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्रमांक 8928/2015 व इतर याचिकांमध्ये दिनांक 6 जूलै, 2017 रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अनुसूचित जमातीचे जातप्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचा-यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबतची कार्यवाही संदर्भ क्र 1 च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, अहिल्यानगर अंतर्गत आरोग्य सेवक (महिला) या संवर्गातील एकूण 04 कर्मचारी यांच्या सेवा उक्त संदर्भ क्र 3 ते 6 येथील आदेशान्वये अधिसंख्य पदावर वर्ग करणेत आल्या आहेत. तसेच त्यांचा अधिसंख्य पदावरील कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुढील 11 महिने किंवा त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर पुढील 11 महिन्यांकरीता मुदतवाढ देण्यात आली होती.

उपरोक्त संदर्भ क्र 7 येथील शासन निर्णय दिनांक 04/10/2024 मधील तरतुदीनुसार अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या कर्मचा-यांचा तांत्रिक खंड सर्व सेवा विषयक (पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून), सेवा निवृत्ती विषयक लाभांसाठी क्षमापित करण्याबाबत सूचना आहेत.

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, अहिल्यानगर अंतर्गत आरोग्य सेवक (महिला) या संवर्गातील खालील अधिकारी/कर्मचारी यांना 1 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन, पुढील 11 महिन्यांच्या कालावधीसाठी त्यांचे नावासमोर दर्शविल्यानुसार किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकास सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत,यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावरील नियुक्तीस खलीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

| अ क्र | कर्मचा-याचे नांव | पदनाम व कार्यालय | सेवा निवृत्तीचा दिनांक | 11 महिन्याच्या सेवासमाप्ती / अधिसंख्य पदावर सेवा समाप्तीचा दिनांक | तांत्रिक खंडाचा दिनांक | नियुक्तीस पुढील 11 महिन्यांसाठी मुदतवाढ |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | श्रीम सुनिता भाऊराव माने | प्रा आ केंद्र मांजरी ता राहुरी | 31/05/2029 | 10/09/2025 | 11/09/2025 | 12/09/2025 ते 11/08/2026 |
| 2 | श्रीम संगिता बाळकृष्ण रोकडे | प्रा आ केंद्र चंदनापुरी ता संगमनेर | 31/12/2032 | 12/10/2025 | 13/10/2025 | 14/10/2025 ते 13/09/2026 |
| 3. | श्रीम पार्वती किसन गायकवाड | उपकेंद्र शेलद, प्रा आ केंद्र विठा, ता अकोले | 31/05/2033 | 12/10/2025 | 13/10/2025 | 14/10/2025 ते 13/09/2026 |
| 4. | श्रीम हिराबाई किसन गायकवाड | प्रा आ केंद्र खर्डा ता जामखेड | 31/05/2028 | 12/10/2025 | 13/10/2025 | 14/10/2025 ते 13/09/2026 |

उपरोक्त कर्मचा-यांचे बाबत, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक 21 डिसेंबर, 2019 च्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अधिकारी/कर्मचा-यांचा प्रत्येक 11 महिन्यांच्या सेवेनंतरचा 01 दिवसाचा तांत्रिक खंड, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक 04 ऑक्टोबर, 2024 मधील तदतुदीनुसार सर्व सेवा विषयक लाभ (पदोन्नती व अनुकंपा वगळून) व सेवा निवृत्ती विषयक लाभांसाठी क्षमापित करण्यात येत आहे. संबंधित कर्मचा-यांना पदोन्नतीचा लाभ देय नसल्याने त्यांना सेवाअंतर्गत अश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

तसेच संबंधित कर्मचारी यांना यापूर्वी दिलेले खालील प्रमाणे तांत्रिक खंड सर्व सेवा विषयक लाभ (पदोन्नती व अनुकंपा वगळून) व सेवा निवृत्ती विषयक लाभांसाठी क्षमापित करण्यात येत आहेत.

| अ क्र | कर्मचा-याचे नांव | पदनाम व कार्यालय | क्षमापित करणेत येत असलेले तांत्रिक खंड |
|---|---|---|---|
| 1. | श्रीम सुनिता भाऊराव माने | प्रा आ केंद्र मांजरी ता राहुरी | दि. 09/11/2023, दि. 10/10/2024 |
| 2 | श्रीम संगिता बाळकृष्ण रोकडे | प्रा आ केंद्र चंदनापुरी ता संगमनेर | दि. 12/11/2024 |
| 3. | श्रीम पार्वती किसन गायकवाड | उपकेंद्र शेलद, प्रा आ केंद्र विठा, ता अकोले | दि. 12/11/2024 |
| 4. | श्रीम हिराबाई किसन गायकवाड | प्रा आ केंद्र खर्डा ता जामखेड | दि. 12/11/2024 |

वर नमुद कर्मचारी यांच्या वेतनावर होणारा खर्च संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी वेतनासंबंधिच्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा आणि संबंधित वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातुन भागवावा.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या (www.nagarzp.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक 202510091002S2 असा आहे.

Signed by Anand
Subhashlal Bhandari
Date: 09-10-2025 21:03:29
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रति,

संबंधित सर्व कर्मचारी.

व्दारा व प्रत - संबंधित सर्व वैद्यकिय अधिकारी, प्रा आ कें .

2/- उपरोक्त नमुद कर्मचारी यांना सदर आदेशाची प्रत बजावून त्यांची दिनांकीत घेतलेली पोहच तात्काळ इकडेस सादर करावी.

प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रत- निवड नस्ती.

स्वाक्षरी xxx
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, अहिल्यानगर